सेवाग्राम, जिल्हा वर्धा विकास
आराखडा
निधी वितरणाबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक- सेविआ २०१७/प्र.क्र.६ /का.१४४३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २२ सप्टेंबर, २०१७

वाचा : १) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. सेविआ २०१३/प्र.क्र.१७/का.१४४३, दिनांक १ ऑक्टोबर, २०१६.

२) विभागीय आयुक्त,नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र.निशा/सेविआ/संस/२०१७/२६४१, दि.६.९.२०१७

३) जिल्हाधिकारी, वर्धा यांचे पत्र क्र.कक्ष एल/विआ/संस-३/कावि-१४१/१७-१८, दिनांक २८.८.२०१७.

प्रस्तावना :

सेवाग्राम, जिल्हा वर्धा परिसरात पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी सेवाग्राम विकास आराखड्यातील रु.१४४.९९७५ कोटी खर्चाच्या प्रस्तावित कामांना संदर्भाधीन क्र.१ येथील दिनांक १.१०.२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सदर आराखड्यातील कामांकरिता विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या दि.३.९.२०१७ च्या पत्रान्वये व जिल्हाधिकारी, वर्धा यांनी दिनांक २८.८.२०१७ च्या पत्रान्वये मागणी केल्यानुसार सन २०१७-१८ या वर्षासाठी निधी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सेवाग्राम विकास आराखडा, जि.वर्धा या योजनेतील कामांसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी रु.९३.८० कोटी इतका निधी मार्च, २०१७ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. सदर निधी जिल्हाधिकारी, वर्धा यांना खालीलप्रमाणे एकूण रु. १०.०० कोटी (अक्षरी रुपये दहा कोटी फक्त) निधी लेखाशिर्षांतर्गत खालील प्रमाणे वितरीत करण्यात येत आहे.

(रुपये कोटीत)

अ.क्र.	उद्दिष्ट	सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी अर्थसंकल्पिय तरतूद	सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी वितरीत करावयाची रक्कम
१	२८-व्यावसायिक सेवा	३.००	१.३०
२	५३-मोठी बांधकामे	९०.८०	८.७०
एकूण		९३.८०	१०.००

सदरहू खर्च मागणी क्रमांक ओ-१०, ४५१५-इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च, १०२-सामुहिक विकास, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना, (०१)-बुहउद्देशिय कार्यक्रम, (०१)(४२)-सेवाग्राम विकास योजना, जिल्हा वर्धा (४५१५०८६१) या लेखाशिर्षांखाली खर्ची टाकण्यात यावा. वर नमुद केलेल्या लेखाशिर्षांतर्गत झालेला प्रत्यक्ष खर्च व महालेखापाल कार्यालयाने नोंदविलेल्या **खर्चाचा दरमहा ताळमेळ घालण्यात यावा. वितरीत करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास तात्काळ सादर करावे.**

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/ अर्थ-३, दिनांक ३०.६.२०१७ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९२२१७४४१८०४१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Maya Roop Vasudeo
Date: 2017.09.22 18:07:59 +05'30'

(मा.रु. वासुदेव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर
३) वित्त विभाग (व्यय-८), (अर्थ-१६), मंत्रालय, मुंबई
४) विभागीय आयुक्त नागपूर विभाग, नागपूर
५) जिल्हाधिकारी, वर्धा
६) जिल्हा नियोजन अधिकारी, वर्धा
७) नियोजन विभाग, का.१४२४, मंत्रालय, मुंबई
८) निवड नस्ती, नियोजन विभाग, का.१४४३, मंत्रालय, मुंबई.